मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# करदात्यांना 24 कोटींची भरघोस कर सवलत


## साडेतीन लाख करदात्यांनी घेतला लाभ : सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध सवलतींचा शहरातील साडेतीन लाख करदात्यांनी लाभ घेतला आहे. या करदात्यांना तब्बल २४ कोटी ३२ लाख रुपयांची कर सवलत मिळाली आहे, अशी माहिती कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळा जमीन, मिश्र यासह विविध अशा ६ लाख २५ हजार मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर संकलन विभागाच्या वतीने कर वसूल करण्यात येतो. २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६ लाख २५ हजार मालमत्तांपैकी ५ लाख ११ हजार १५४ मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ९७७ कोटी ५० लाख रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. गतवर्षी या विभागाने ८१६ कोटींचा कर वसूल केला होता. यंदा तब्बल १६१ कोटींचा अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.

महापालिकेच्या वतीने करदात्यांना आगाऊ कर भरल्यास, ऑनलाईन आगाऊ भरणा केल्यास, महिलांच्या नावावर मालमत्ता असल्यास करात सवलत, दिव्यांग, माजी सैनिक, शौर्य पदक धारक, पर्यावरण पूरक सोसायटी, पर्यावरण पूरक खासगी शैक्षणिक संस्था अशा विविध प्रकारे करामध्ये सवलत देण्यात येते.




### १६ हजार १३२ सदनिका धारकांना पर्यावरण पूरक सवलतींचा मिळाला लाभ

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झिरो वेस्ट प्रकल्प राबवून पर्यावरणासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या शहरातील १६ हजार १३२ सदनिका धारकांना तब्बल ७१ लाख रूपयांची घसघशीत अशी मिळकत कराच्या सामान्य करातून सवलत मिळाली आहे.

### असा घेतला लाभ

रोख अथवा धनादेशाद्वारे आगाऊ कर भरणा करणाऱ्या ८६ हजार २५२ मालमत्ता धारकांना ३ कोटी ४५ लाख, ऑनलाईन आगाऊ कर भर भरणा करणाऱ्या २ लाख ४५ हजार २५३ जणांना सर्वाधिक १५ कोटी ६२ लाख, मालमत्ता महिलांच्या नावावर असल्यामुळे १२ हजार ५५९ महिलांना २ कोटी १४ लाख, १२५७ दिव्यांगांना ३ लाख, ३ हजार ४५२ माजी सैनिकांना २ कोटी ८ लाख रुपयांची भरघोस अशी करातून सवलत मिळाली आहे.

> करदात्या नागरिकांना करांमध्ये विविध सवलती देण्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्रेसर आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी कर भरण्याची अंतिम मुदत ३१ मे २०२४ पर्यंत आहे. गत वर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांनी आपल्या कराचा भरणा करून संबंधित लागू असलेल्या सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> – **शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

---

# महायुतीमध्ये "आरपीआय"चे नाराजीनाट्य!

## खासदार श्रीरंग बारणेंचा प्रचार करणार नाही : आरपीआय गटाची भूमिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ काळेवाडी येथे आयोजित बैठकीत आरपीआय आठवले गटाच्या पदाधिकाऱ्यांचे नाराजीनाट्य पाहायला मिळाले. आरपीआय आठवले गटाचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे यांना व्यासपीठावर न बोलवल्याने आणि त्यांचा नामोउल्लेख न केल्याने आरपीआय आठवले गटाच्या काही कार्यकर्त्यांनी बैठकीतून काढता पाय घेत नाराजी व्यक्त केली.

जोपर्यंत रामदास आठवले यांचा आदेश येत नाही. तोपर्यंत आम्ही श्रीरंग बारणे यांचा प्रचार करणार नाहीत, अशी भूमिका आरपीआय गटाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली होती. मात्र मंत्री उदय सामंत आणि महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी सप्नील कांबळे यांची समजूत काढली. सूत्रसंचालककांकडून चूक झाल्याचे सांगत नाराजी दूर केली, आणि व्यासपीठावर त्यांना स्थानापन्न केले.

पिंपरी- चिंचवडमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी आज एक बैठक



आयोजित करण्यात आली आहे. बैठकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, उदय सामंत यांच्यासह महायुतीतील सर्व शहराध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित आहेत.

दरम्यान, या बैठकीदरम्यान नाराजी नाट्य बघायला मिळालं. आरपीआय गटाचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे यांचा नामोल्लेख आणि व्यासपीठावर बसण्यास न बोलावल्याने त्यांच्यासह काही पदाधिकारी यांनी या बैठकीतून काढता पाय घेत नाराजी व्यक्त केली. शेजारून जाणाऱ्या सामंत यांनी या आरपीआय आठवले गटाच्या नाराजीची कुणकुण लागल्याने त्यांनी पदाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. सामंत यांनी मध्यस्थी करत उमेदवार श्रीरंग बारणे यांच्याशी शहराध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची भेट घडवून या नाराजी नाट्यावर पडदा टाकला.

कोणत्याही परिस्थितीत मावळमधून महायुतीचा उमेदवार निवडून आला पाहिजे. गेल्यावेळी पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले पाहिजे. आपला विरोधी उमेदवार संजोग वाघेरे यांच्याशी अनेक वर्षांचे संबंध आहेत. परंतु, निवडणुकीची प्रचार यंत्रणा सुरू झाल्यावर काही गोष्टी पाळाव्या लागतात. १३ तारखेचे मतदान होईपर्यंत विरोधी उमेदवाराला भेटायला जाऊ नका, गप्पा-टप्पा मारायला जाऊ नका, निवडणूक काळापर्यंत नातेसंबंध बाजूला ठेवावे, असे आवाहन अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना केले.

# माझ्यासोबत पुणेकरांचे प्रेम

## काँग्रेस कार्यकर्त्यांकडून रविंद्र धंगेकरांना 42 हजारांचा निधी : मुरलीधर मोहोळांचा धंगेकरांना टोला

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीकडून भाजपचे नेते माजी महापौर मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर, तर वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे यांना उमेदवारी जाहीर केली. या तीनही उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात झाली असून दोन दिवसांपूर्वी कोथरूड विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. त्या मेळाव्यात आमदार रवींद्र धंगेकर यांना कार्यकर्त्यांनी ४२ हजारांचा निधी जमा केलेली पिशवी भेट म्हणून दिली. त्यावरून शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले.

कोथरूडमधील एका कार्यक्रमात काँग्रेस कार्यकर्त्यांनी ४२ हजारांचा निधी रविंद्र धंगेकर यांना दिला आहे. त्यावर मुरलीधर मोहोळ म्हणाले की,आमचा पक्ष लोकशाही मानणारा असून त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे तो मी मुरलीधर मोहोळ आहे. एका कार्यकर्त्याला पुणे लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे खूप आनंदी असून देशात आमच्या ४०० हून अधिक खासदार निश्चित निवडून येणार आहेत. तसेच पुणे लोकसभेचा विचार करायचा झाल्यास पुण्यात केंद्र सरकारच्या विविध योजनेचा तब्बल अडीच लाख नागरिकांनी लाभ घेतला आहे. तसेच आजवर पुणेकर नागरिक नेहमीच भाजप पक्षाच्या पाठीशी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत देखील पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी उभे राहतील आणि सहाही विधानसभा मतदारसंघात मताधिक्य घेणार असल्याचा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.



मुरलीधर मोहोळ पुढे म्हणाले की, कोथरूडमधील एका कार्यक्रमात कोणाला तरी (रविंद्र धंगेकर) नागरिकांनी निधी दिल्याचे सांगत असला, तर त्यावर मला बोलायच नाही. पण तुम्हाला (रविंद्र धंगेकर) निधी मिळाला म्हणजे प्रेम मिळाले असे होत नाही. पण माझ्यासोबत पुणेकरांचे प्रेम आहे. तुम्ही लोकांसाठी काय करणार आहात आणि काय आहात, हे अधिक महत्वाचे आहे. त्यामुळे मी एकच सांगू इच्छितो की, आम्ही पुणेकर नागरिकांचे मन जिंकले असून त्यामुळे सर्व नागरिक आमच्या सोबत असल्याचे सांगत महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना टोला लगावला.

# अस्वच्छतेवरून सहा कोटींचा दंड वसूल

## 3 महिन्यांत 17 हजाराहून अधिक नागरिकांवर दंडात्मक कारवाई : महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाची कामगिरी

**पुणे | प्रतिनिधी**

उघड्यावर कचरा टाकू नये, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, कचरा जाळू नये, अशा सूचना ठिकठिकाणी लावल्या जातात. त्या सूचना नागरिकांकडून वाचल्याही जातात. परंतु त्यानुसार कृती होत नसल्याचे वारंवार दिसून येत असल्याने सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे साम्राज्य वाढत आहे. नागरिकांच्या वागण्यात तसेच त्यांच्या मानसिकतेत बदल घडावा आणि 'आपलं शहर स्वच्छ शहर' ही संकल्पना रुजावी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तरीसुध्दा नागरिकांना जबाबदारीची जाणीव होत नसल्याने महापालिकेच्या घनकचरा विभागाने अशा व्यक्तींवर कारवाईचा बगडा उगारणे सुरू केले आहे. गेल्या तीन महिन्यात १७ हजारांहून अधिक नागरिकांवर दंडात्मक कारवाई करून सहा कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

स्वच्छ सर्वेक्षणमध्ये पुणे शहराचा क्रमांक देशात पहिल्या पाचमध्ये आणण्याचे ध्येय महापालिका प्रशासनाने ठेवले आहे. देशात स्वच्छ असलेल्या पहिल्या क्रमांकाचे इंदूर शहराचा महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने अभ्यास दौरा केला होता. त्यानंतर इंदूर शहरातील काही महत्त्वाचे आणि स्वच्छतेच्या दृष्टीने प्रभावी असलेले उपाय पुण्यात केले जात आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

### 'स्पेशल स्कॉड व्हेईकल'मुळे दंडवसुली जोरात

हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालय, नगररोड-वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालय आणि कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालय, या तीन क्षेत्रीय कार्यालय आणि प्लास्टिक स्कॉड (मुख्य कार्यालय ) यांना माजी आयुक्त विक्रम कुमार यांच्या हस्ते चार चाकी गाड्यांचे वितरण



करण्यात आले होते. त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यक्षमता उंचावली आहे. शहरात अस्वच्छता करणाऱ्यांवर पथकाकडून लक्ष ठेवले जात आहे. घटनास्थळी कारवाई पथक जात असून थेट कारवाईचा बडगा उगारला जात आहे. त्यामुळे विभागाच्या दंडात्मक कारवाईचे प्रमाण चांगलेच वाढले आहे.

### अशी झाली कारवाई

सार्वजनिक जागी थुंकणे, कचरा जाळणे, अस्वच्छता करणे या कारणांसाठी दंडात्मक कारवाई

१ ऑक्टोबर ते ३० डिसेंबर २०२३ या काळात शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या माध्यमातून १ कोटी रुपयांचा दंड वसूल

गेल्या वर्षभरात एकूण १ कोटी ६६ लाखांचा दंड वसूल

स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी गेल्या चार महिन्यात २४ हजाराहून अधिक व्यक्तींवर कारवाई

वर्षभरात एकूण ३७ हजाराहून अधिक पुणेकरांवर दंडात्मक कारवाई

### मागील तीन महिन्यातील कारवाई

सार्वजनिक ठिकाणी थुंकल्या प्रकरणी ३९४ जणांकडून ३ लाख ९५ हजार ५०० दंड वसूल

सार्वजनिक ठिकाणी लघवी केल्या प्रकरणी १,०९५ जणांकडून २ लाख २१ हजार ९२० रुपये वसूल

बांधकाम राडारोडा टाकणाऱ्या १२१ जणांकडून ३ लाख ४८ हजार २०० वसूल

प्लास्टिक कारवाई करत ५४८ जणांकडून १ कोटी १८ लाख वसूल

उघड्यावर कचरा जाळल्या प्रकरणी ४८९ जणांकडून ३ लाख ११ हजार ५०० रुपये वसूल

कचऱ्याचे वर्गीकरण न केल्याबद्दल १,००९ जणांकडून १ लाख ४० हजार ५३० रुपये वसूल

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता केल्या प्रकरणी १४,२९२ जणांकडून ५ लाख ८५ हजार ६६४ रुपये वसूल

> महापालिका हद्दीतील प्रत्येक भाग हा स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने घनकचरा व्यवस्थापनाचे कर्मचारी बेशिस्त नागरिकांवर दंडात्मक कारवाई करत आहेत. केवळ दंडवसुली एवढेच ध्येय महापालिकेचे नाही. नागरिकांनी 'माझ्या शहराच्या स्वच्छतेची जबादारी माझीच आहे,' असे मनात ठेवून उघड्यावर कचरा टाकू नये किंवा अस्वच्छता करू नये. दररोज कचरा उचलला जाणे, त्याचे वर्गीकरण होणे, कचरा उघड्यावर फेकला न जाणे, यावर देखरेख करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.
>
> – संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग.

# मावळ लोकसभेत शिवसेनेचा जोरदार प्रचार

## बिजलीनगर, चिंचवड परिसरात संजोग वाघेरेंच्या गावभेट दौऱ्यास प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

गद्दारांना गद्दारी काय असते याचा धडा शिकविण्यासाठी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व कार्यकर्ते व सामान्य मतदार आता सज्ज झाला असून आता त्यांच्या पराभवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी वाट पहावी लागणार असल्याचे संजोग वाघेरे-पाटील यांनी सांगितले. आज सोमवारी (दि. 8) सकाळी झालेल्या वाल्हेकरवाडी - रावेत गावभेट दौऱ्यात ते मतदारांशी संवाद साधत होते. त्यावेळी त्यांनी विश्वास व्यक्त केला. या वेळी सेल्फी, हस्तांदोलन अन शुभेच्छांनी गावभेटी दौऱ्याचा उत्साह वाढला होता.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) मुख्य प्रवक्ते माधव पाटील, सागर चिंचवडे, गणेश भोंडवे, कामगार आघाडीचे संदीप शिंदे, राहुल धनवे, आम आदमी पार्टीचे शहर संघटक सचिन पवार, कमलेश रनावरे, वैजनाथ शिरसाठ, रोहित सरनोबत, भरत दास, दगडूछ मरळे, माथाडी कामगार संघटनेचे हनुमंत तरडे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, पदाधिकारी, युवा कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाघेरे पाटील म्हणाले की, तरुणांना नोकऱ्या नाहीत आजचा तरुण बेरोजगार झाला आहे. देश देशोधडीला लागला आहे, शेतकऱ्यांचा विषय गंभीर आहे. कामगारांना न्याय मिळत नाही त्यामुळे मतदारांनी जागे झाले पाहिजे. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. शहरी आणि गावातील प्रश्नांना न्याय देण्यासाठी मी पूर्ण पर्यंत करणार असल्याचे मावळ लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, मतदारांकडून आणि जेष्ठ नागरिक, तरुणांकडून उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचे मनापासून स्वागत केले.



अडीअडचणीत असलेल्या सर्वसामान्यांना मदतीचा हात देणारं नेतुत्व आणि समाजाची असलेलं नाळ अश्या भावना या वेळी मतदारांनी व्यक्त केल्या.

### अन् चिमुकलीने उमेदवार वाघेरे पाटलांना भरविला पेढा..

बिजलीनगर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे गावभेट दौरा करीत असताना एका लहान चिमुकलीने हि त्यांचे औक्षण करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मतदार अक्षरशा भारावून गेले होते. वाघेरे पाटील यांच्यातील असलेला जीवाळा आणि प्रेम पाहून चिमुकलीने त्यांना पेढा भरविला.

### गावभेटी दरम्यान काय म्हणाले मतदार..

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचे मुद्देसूद पण सर्व सामान्य नागरिकाशी थेट बोलतात, समाजसेवेला प्रथम प्राधान्य देणारा, सर्व स्तरातील लोकांना आपुलकीने वागणे, एकदम साधी राहणीमान, यामुळे वाघेरे यांच्याभोवती लोकांचा घोळका जमा होत होता, असे चित्र या वेळी पहावयास मिळत होते. त्यामुळे मावळ लोकसभा मतदार संघातील मतदार संजोग वाघेरे पाटलांच्याच गळ्यात विजयाची माळ घालणार आणि स्वाभीमानी विचाराच्या शिवसेनेचा शिलेदार म्हणून त्यांना लोकसभेत पाठविणार आहेत, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.

मावळ लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा होता. आगामी निवडणुकीत देखील त्या ठिकाणी गद्दारांचा पराभव करून पुन्हा शिवसेनेचा खासदार मी होईल, अशी आशा संजोग वाघेरे यांनी व्यक्त केली आहे.

### गद्दारांना धडा शिकविणार; युवासेनेचा निर्धार

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना प्रमुख चेतन (अण्णा) पवार म्हणाले की, "भाजपाने देशात आणि राज्यात लोकशाही संपवण्याचा डाव आखला गेला आहे. लोकशाही संपवून हुकुमशाहीकडे वाटचाल करण्याची मानसिकता काही लोकांची आहे. ही मानसिकता हाणून पाडण्यासाठी प्रयत्न करायचा आहे. आज पर्यंत पिंपरी, चिंचवड विधानसभेत युवा सेनेचा असा मेळावा कधी झालाच नाही. मावळ लोकसभा मतदारसंघातील गावा गावात पक्ष आणि चिन्ह घराघरात पोहचवण्याचे काम करत आहे. गेले ते कधीच आपले नव्हते, त्यांनी स्वतः साठी पक्ष बदलला अश्या गद्दारांना धडा शिकवण्यासाठी हा मेळावा आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात शिलेदार संजोग वाघेरे पाटील यांना जास्तीत जास्त मताधक्याने निवडून देवू", असा निर्धार युवासेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला.

# चऱ्होली परिसरात बिबट्याचे दर्शन

## वन विभागाकडून पाहणी : नागरिकांनी एकट्याने न फिरण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली परिसरात शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सोशल मीडियावर या बाबतचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. नागरिकांनी वन विभागाला याबाबत कळविल्यानंतर वन विभागाकडून सध्या पाहणी सुरू आहे. नागरिकांनी परिसरात एकट्याने न फिरण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे.

दिघी परिसरातील साई मंदिराच्या पाठीमागील परिसरातील शेतामध्ये गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचा संशय शेतकऱ्यांना होता. शेतकऱ्यांनी लावलेल्या सीसीटीव्हीमध्ये त्याबाबत तपासणी करण्यात आली. या वेळी बिबट्या फिरत असल्याचे सीसीटीव्हीत निर्दशनास आले. या वेळी संबंधित शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना याबाबत माहिती दिली.

त्यांच्याकडून वन विभागाला या बाबत कळविण्यात आली. वन विभागाकडून वन परिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वन अधिकारी अनिल राठोड यांच्या नेतृत्वाखाली सात ते आठ जणांच्या टीमने शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी बिबट्याच्या खुणा आढळून आल्याचे निदर्शनास आले.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्याला ट्रॅप करण्यासाठी सध्या शेतामध्ये कॅमेरे लावले आहेत. रविवारी (दि. ७) संध्याकाळी त्याबाबत तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी रात्रभर



थांबणार आहेत. बिबट्याचा रात्री उशिरा या परिसरात वावर असल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाकडून वर्तविण्यात येत आहे. दिवसभर उन्हामुळे गारव्यात जाऊन बसत आहे.

रात्री बिबट्या बाहेर येत असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येत आहे. त्यावर लक्ष ठेवून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येत आहे. हा बिबट्या सलग तीन दिवस याच परिसरात आढळल्यांनतर पिंजरा लावून पकडण्यात येणार आहे. अन्यथा एका जागी न राहता बिबट्या १५ किलोमिटर लांब दुसरीकडे देखील जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या पुर्वी निरगुडी, चऱ्होली मध्ये एक बिबट्या आढळला होता. तो हाच बिबट्या असण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

आज सकाळपासूनच वनविभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर अनिल राठोड यांच्यासह आठ जणांचे पथक या परिसरामध्ये तपासणी करत आहे.

> गेल्या दोन ते तीन दिवसांपासून या परिसरामध्ये बिबट्याचे वास्तव्य असल्याच्या तक्रारी आहेत त्या ठिकाणी म्हणजेच साई मंदिरापासून चरोलीपर्यंतच्या भागापर्यंत असणाऱ्या शेतीच्या परिसरामध्ये तपासणी सुरू आहे तसेच ठीक ठिकाणी कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. त्यातून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. दिवसा या भागात एकदाही बिबट्या बाहेर आलेला नाही रात्री या भागात बिबट्या फिरत असल्याचे आढळून येत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता रात्रीच्या वेळी घराबाहेर पडू नये. शेतकऱ्यांनीही एकट्याने शेतात जाऊ नये. काळजी घ्यावी, बिबट्या आढळल्यास वनविभागास कळवावे.
>
> **- अनिल राठोड, वन अधिकारी, पुणे वन परिक्षेत्र.**

# मावळमधून महायुतीचा उमेदवार निवडून आला पाहिजे

## मावळ मतदारसंघातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय मेळावा

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय मेळावा सोमवारी (८ एप्रिल) काळेवाडी येथे पार पडला.

कोणत्याही परिस्थितीत मावळमधून महायुतीचा उमेदवार निवडून आला पाहिजे. गेल्यावेळी पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले पाहिजे. आपला विरोधी उमेदवार संजोग वाघेरे यांच्याशी अनेक वर्षाचे संबंध आहेत. परंतु, निवडणुकीची प्रचार यंत्रणा सुरू झाल्यावर काही गोष्टी पाळाव्या लागतात. १३ तारखेचे मतदान होईपर्यंत विरोधी उमेदवाराला भेटायला जाऊ नका, गप्पा-टप्पा मारायला जाऊ नका, निवडणूक काळापर्यंत नातेसंबंध बाजूला ठेवावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांना केले. वाघेरे सांगत आहेत की, मीच त्यांना तिकडे पाठवले, लढायला लावले. हे सगळे खोटे असून अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही त्यांनी केले.




मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय मेळावा सोमवारी (८ एप्रिल) काळेवाडी येथे पार पडला. मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, सुनील शेळके, उमा खापरे, आठवले गटाच्या चंद्रकांता सोनकांबळे यावेळी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, काळ बदलला आहे. आता विकासाच्या राजकारणावर भर दिला पाहिजे. विकासाची वज्रमूठ बांधली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मोदी यांच्या हाती देश सुरक्षित आहे. जगाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर आणायची आहे. त्यासाठी तिसऱ्यांदा मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे. जनतेचा कल मोदींच्या बाजूने आहे विकास कामे मतदारपर्यंत पोहोचवावीत. दहा वर्षांत जगाची मोठी प्रगती झाली आहे. याला गॅरंटी म्हणतात. पक्षाला, उमेदवारी मिळाली नाही म्हणून असंतुष्ट राहू नये, विरोधी पक्षाकडे पंतप्रधान पदासाठी चेहरा नाही. ही निवडणूक विचारांची नव्हे विकासाची आहे. प्रत्यक्षात कृतीत येऊ शकत नाहीत, अशी आश्वसने विरोधकांनी दिली आहेत.

महिलेच्या खात्यात एक लाख रुपये टाकायचे हे दिलेले आश्वसन शक्य आहे का, ही निवडणूक तरुणांचे भवितव्य ठरवणारी आहे. विरोधकाकडे कोणताही मुद्दा नाही. संविधान बचाव, देश बचाव असे मोर्चे काढले जात आहेत. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत कोणीही संविधान बदलू शकत नाही. काहीजण म्हणतात यापुढे निवडणूक होणार नाही. ही शेवटची निवडणूक, येथून पुढे हुकूमशाही येणार, असे मते मिळविण्यासाठी काहीही बोलतात. एवढ्या मोठ्या देशात निवडणूक न होणे हे शक्य आहे का? असेही पवार म्हणाले.

जनतेचा कल मोदींच्या बाजूने आहे लोकसभा निवडणूक ही गाव किंवा भावकीचे नसून ती देश पातळीवरील निवडणूक आहे. ह्या देशातील जनतेने पंतप्रधान मोदींचा 10 वर्षाचा विकास कामांचा धडाका पाहिला आहे. त्यामुळे जनतेचा कल हा मोदींच्या बाजूने आहे.

### मावळमध्ये भाजपचा विरोध नाही

» उमावळमध्ये महायुतीच्या उमेदवाराला भाजपचा कोणताही विरोध नाही. मी दररोज देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी या मतदारसंघाबाबत बोलत असतो. त्यामुळे आता मावळात श्रीरंग बारणेंना भाजपकडून कोणताही विरोध नसल्याचं पवार यांनी सांगितलं.अजित पवारांनी यावेळी एकनाथ खडसेंच्या भाजप प्रवेशाबाबत वक्तव्य केलं. "खडसेसाहेब भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, हे मी आजच ऐकलं. बऱ्याच दिवसापासून त्यांच्या मनामध्ये चल बिचल चालली होती. शेवटी ज्याच्या मनामध्ये जो योग्य निर्यण होतो त्या पद्धतीचा निर्णय घेऊन ते पुढे जात असतात," असंही अजित पवार म्हणाले. आम्ही देखील मोदींच्या विकास कामांच्या धोरणामुळेच त्यांच्यासोबत जायचं ठरवलं असल्याचं अजित पवारांनी सांगितलं. तसेच महायुतीकडून बारामतीचा उमेदवार कोण असेल हे सुरुवातीला जनतेला माहिती नव्हतं, मात्र आता महायुतीचा उमेदवार जाहीर झालेला आहे. शिवाय बारामतीची जनता मोदींच्या विकास कामाच्याबाजूने जाईल असा आमचा विश्वास असल्याचंही पवार म्हणाले.

# टोल दरवाढीतून मुक्ती, प्रवाशांना दिलासा

## यंदा ही दरवाढ न झाल्याने वाहनचालक, मालकांच्या खिशाला बसणारा भुर्दंड वाचला

**पुणे | प्रतिनिधी**

प्रत्येक वर्षी १ एप्रिलपासून टोलदरवाढ केली जाते. यंदा ही दरवाढ न झाल्याने प्रवाशांच्या खिशाला बसणारा भुर्दंड वाचला असून, नियमित मुंबई-पुणे प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

एक एप्रिल पहाटेपासून नवीन टोलदरवाढ होणार ही गोष्ट अटळ असे समजून आपल्या खिशाला किती टक्क्यांचा भुर्दंड बसणार याचा विचार पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरून नियमित प्रवास करणारे वाहनचालक, मालकांना पडला होता.

अगोदरच पेट्रोल, डिझेल, सीएनजी इत्यादींचे दर गगनाला भिडले असून तो सर्वच वाहनचालकांच्या दृष्टीने आवाक्याबाहेर गेला होता. या दरवाढीमुळे वाहने वापरणे हे मध्यम वर्गीयांच्या दृष्टीने कठीण झाले आहे.

प्रत्येक वर्षी टोलदरवाढ एक एप्रिल पहाटेपासून लागू केली जाते. सद्यःस्थितीत पूर्वीच्याच टोलदराप्रमाणे टोल वसुली सुरू आहे. सध्या कोणतीच वाढ न झाल्याने वाहनचालक, मालकांना टोल दरवाढीतून काहीसा दिलासा मिळाल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱयांनी समाधान व्यक्त केले.



टोल दरांची वार्षिक सुधारणा ही आयोजित नियमित व्यायामाचा एक भाग आहे, जिथे घाऊक किंमत निर्देशांक-आधारित चलनवाढीच्या बदलांवर आधारित समायोजन केले जाते. ही प्रक्रिया सुनिश्चित करते की टोलचे दर आर्थिक चढउतारांशी जुळतात, ज्यामुळे महामार्ग प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता टिकून राहते आणि ऑपरेशनल खर्चाची पूर्तता देखील होते.

नॅशनल हायवे बिल्डर्स फेडरेशन, हायवे डेव्हलपर्स संघटनांचे प्रतिनिधीत्व करत आहे, कडून सवलतधारकांना सुधारित टोल दर स्थानिक वर्तमानपत्रात प्रकाशित करू नयेत आणि 1 एप्रिलपासून टोल दर सुधारणा लागू करण्यापासून परावृत्त व्हावेत अशा मौखिक सूचनांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. असा युक्तिवाद केला आहे की अशा सूचना राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम आणि सवलत कराराच्या तरतुदींचा विरोध करतात.